# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र

# पोलीस अधीक्षक कार्यालय नागपूर

दिनांक ०५/०९/२०२१ (रविवार )

## पाच युवकांचा बुडुन मृत्यु

आज दिनांक ०५/०९/२०२१ रोजी यवतमाळ जिल्हयातील दिग्रस येथील १२ भावीक क्रुजर वाहनान यवतमाळ वरुन जुनी कामठी येथील मरीयम अम्मा का दरगाह मध्ये दर्शनासाठी आले होते १२ भावीकांपैकी पाच भावीक १) सय्यद अरबाज सय्यद परवेज वय २१ वर्ष, २) ख्वाजा बेग तस्वर बेग वय १९ वर्ष, ३) मोहम्मद सत्पतीन मोहम्मद इकबाल वय २० वर्ष, ४) अय्याज बेग हाफीज बेग वय २२ वर्ष, ५) मोहम्मद अबुजर मोहम्मद अल्ताफ वय २१ वर्ष, हे अंदाजे ०८.३० वा. दरम्यान कन्हान नदीत आंघोळ करणेकरिता नदीच्या पाण्याचा अंदाज न घेता खोल पाण्यात उतरले. त्यात या पाच युवकांचा नदीचे पाण्यात बुडुन दुर्देवी मृत्यु झाला. स्थानिक पोलीसांना माहिती प्राप्त होताच घटनास्थळी पोहचुन युवकांचा शोध घेण्यासाठी बचाव कार्य सुरु केले. पाण्याचा प्रवाह जास्त असल्यानें अडथळे निर्माण होत असल्याने एस.आर.डी.एफ. पथकाची मागणी करण्यात आली आहे. एस.आर.डी.एफ. पथक घटनास्थळी दाखल झाले असून युवकांचा शोध घेणे सुरु आहे.

## पो.स्टे. खापा अंतर्गत अवैध मोहाफुल हातभट्टी दारु रेड

दिनांक ०४/०९/२०२१ रोजी पोलीस स्टेशन खापा अंतर्गत मौजा हेतीखेडा जंगल शिवारात अवैधरित्या मोहाफुल दारु गाळणाऱ्या आरोपीतां विरुध्द दोन केसेस करण्यात आले. स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण तसेच पो.स्टे. खापाचे स्टाफ चे पथकांनी संयुक्तरित्या मुखबिरद्वारे मिळालेल्या खबरेवरुन मौजा हेतीखेडा जंगल शिवारात रेड केली असता तेथे १) लिलाधर महादेव शोधले वय ३९ वर्ष रा कोथुळणा व २) हुकुमचंद नागो शुक्रेवार वय ३९ वर्ष रा.निमतलाई ता सावनेर हे जंगलातील झुडपीत हातभट्टी मोहाफुलाची गावठी दारु गाळताना मिळुन आले. हुकुमचंद नागो शुक्रेवार वय ३९ वर्ष रा.निमतलाई ता सावनेर हा पोलीसांना पाहुन पळून गेला त्याचा पाठलाग केला असता मिळुन आला नाही. आरोपी लिलाधर महादेव शोधले वय ३९ वर्ष रा कोथुळणा यास ताब्यात घेण्यात आले घटनास्थळावरुन दोन्ही प्रकरणात एकुण १७० लिटर मोहाफुल दारु, ३०० लिटर मोहाफुल सडवा व ईतर साहीत्य असा एकुण २,४८,०००/– चा मुद्येमाल जप्त करुन दोन्ही आरोपी विरुध्द पोलीस स्टेशन खापा येथे अप क्रमांक २४०/२०२१ कलम ६५ (बी)(सी)(ई)(एफ) महाराष्ट्र दारुबंदी कादयान्वये गुन्हा नोद करण्यात असून पुढील तपास पो.हवा. १६५९ गंगाधर ठाकरे पो स्टे खापा हे करित आहेत.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला नागपुर ग्रामीण, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर, उप विभागीय पोलीस अधिकारी सावनेर श्री अशोक सरंबळकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार यांचे मार्गदर्शनात, सपोनि राजीव कर्मलवार, सफौ बाबा केचे, पोहवा चंद्रशेखर

घडेकर, पोना राजेश रेवतकर, आशिष मुळे, किशोर वानखेडे, मपोना नम्रता बघेल, चपोना अमोल कुथे स्थागुशा नाग्रा व पो.स्टे. केळवद चे पोहवा गंगाधर ठाकरे, पोशि सतोष परतेती यांनी पार पाडली.
(सदर बातमीचा फोटो सोबत जोडला आहे)



## —: अवैधरित्या शस्त्र बाळगणे :—

पो.स्टे. काटोल :— काटोल पोलीसांना मिळालेल्या गुप्त खबरे वरुन काटोल शहर येथील घोडे—ले—आऊट येथे राहणारा मिलींद नंदकीशोर शीरपुरकर याचे घराची झडती घेतली असता त्याचे घरात त्याचे ताब्यातुन कोणताही परवाना नसतांना दोन लोखंडी तलवारी मिळुन आले त्याबाबत विचारणा केली असता उडवा उडवीचे उत्तर देवून लागला.

सदर प्रकरणी फिर्यादी पोना सतोश आधंळे वय ३५ वर्ष ब न २०८८ पोस्टे काटोल यांचे लेखी रिपोर्ट वरुन आरोपी मिलींद नंदकीशोर शीरपुरकर वय २८ वर्ष रा घोडे प्लॉट काटोल विरुध्द पो.स्टे. काटोल येथे अप क्रमांक ४२१/२१ कलम ४.२५ शस्त्र अधीनीयम १९५९ भा.द.वी अन्वये गुन्हा नोंद करुन ताब्यात घेण्यांत आहे असून पुढील पोहवा प्रभुदास दलाल मो.नं. ९५६१५६४८५२ हे करित आहेत.

## **—: गोवंशाची सुटका :—**

पो.स्टे.पारशिवनी :— अंतर्गत ०३ किमी अंतरावरील मौजा मौजा पालोरा शिवार एम.जे कॉलेज चौक या चौकात दिनांक .०४/०९/२०२१ चे ११/०० वा. दरम्यान पोलीस स्टेशन पारशिवनी येथील पथकाने टाटा एस वाहन क्रमांक एमएच ४० डीएस १६६७ यास थांबवुन त्याची पाहणी केली वाहन चालक मिलन विजयशंकर तिवारी रा. मनसर यांनी मनोज फुलचंद राऊत याचे सांगण्यावरुन आपल्या वाहनात लहान मोठी एकुण ०६ जनावरे अवैधरित्या विनापरवाना सदर गोवंश यांना वाहनात निट उभे राहता येत नाही, त्यांची चारा—पाण्याची सोय न करता कत्तल करण्याचे उद्देशाने मिळुन आला. ६ गोवंश एकुण ४५,०००/— वाहन किंमत एकुण २,००,०००/— असा एकुण २,४५,०००/— चा माल जप्त करुन गुन्हा नोंद

सदर प्रकरणी फिर्यादी पोहवा गंगाप्रसाद पाचाली वरकडे पो.स्टे. पारशिवनी यांचे लेखी रिपोर्ट वरुन आरोपी १) मिलन विजयशंकर तिवारी वय ४७ वर्ष रा. मनसर, २) मनोज फुलचंद राऊत वय २८ रा. पेठ परसोडी विरुध्द पो.स्टे. पारशिवनी येथे अप क्रमांक २०५/२१ प्राण्याला कुरतेने वागण्यास प्रतीबंध काण्याबाबत अधिनियम १९६०, कलम ११(घ)(ड)(च)(ज) , सह महाराष्ट प्राणीसंरक्षण अधिनियम १९७६ कलम ५( अ),(१),(२),५(ब),११ सह महाराष्ट पोलिस अधिनियम १९५१कलम ११९ सह कलम १०९ भादवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील पोउपनि पळनाटे पोस्टे पारशिवनी मो.न. ७३८७० ८६१७८हे करित आहेत..

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर**